# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

**Dr. Shyam Khandare**
**Director**
**Mo. No. - 7020482443**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 160 /2024** **Dt : 26 / 03 /2024**

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:– **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सर्व रासेयो महाविद्यालयामध्ये मतदार जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भ:– सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग कार्यालय – सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गडचिरोली जा.क्र.सआसक/गड/जि.नो.अ./SVEEP शाखा/मतदान जनजागृती/२०२३–२४/७९६ दिनांक २०/०३/२०२४.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये सविनय विनंती या प्रमाणे आहे कि, आगामी सार्वत्रिक निवडणूकांकरीता ०६७ – आरमोरी, ०६८ – गडचिरोली, ०६९ – अहेरी या तीन विधानसभा मतदार संघाअंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता विविध उपक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. आगामी निवडणूकीसाठी मा. निवडणूक आयोगाने ७५ टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी अपेक्षिलेली आहे.

त्याकरीता मतदान प्रक्रियेत जिल्हयातील सर्व मतदारांचा सहभाग वाढवुन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी रासेयो महाविद्यालयातील स्वंयसेवक, स्वंयसेविका व रासेयो कार्यक्रम अधिकारी मतदान जनजागृती विषयावर रांगोळी स्पर्धा/चित्रकला/वादविवाद स्पर्धा, पथनाटय, कलापथक तसेच गावामध्ये मतदार जनजागृती रॅली आयोजित करणे, स्वीप कार्यक्रमातंर्गत मतदारांसाठी प्रतिज्ञा देणे, याप्रमाणे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत मतदार जनजागृती अभियान असे विविध उपक्रम राबवून किमान ७५ टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी वाढ होण्यास आपण सहकार्य करावे व या संबंध चा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावे.

धन्यवाद!

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
कार्यालय- सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण गडचिरोली
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, LIC ऑफीस जवळ गडचिरोली -४४२६०५
Email :- sdswog@gmail.com
Phone No.:- ०७१३२-२२२१९२

जा.क्र.सआसक/गड/जि.नो.अ./SVEEP शाखा/मतदान जनजागृती/२०२३-२४/796 दिनांक 20/03/२०२४

**निवडणूक / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा. कुलसचिव,
गोंडवाना विदयापिठ गडचिरोली, जिल्हा - गडचिरोली.

**विषय :-** **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४**
**जिल्हयातील सर्व महाविदयालयामध्ये मतदार जनजागृतीपर उपक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली यांचे आदेश क्र.५७६, दि.१८.३.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, आगामी सार्वत्रिक निवडणूकांकरीता ०६७-आरमोरी, ०६८-गडचिरोली, ०६९-अहेरी या तीन विधानसभा मतदार संघाअंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता विविध उपक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. आगामी निवडणूकीसाठी मा.निवडणूक आयोगाने ७५ टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी अपेक्षिलेली आहे.

त्याकरीता, मतदान प्रक्रियेत जिल्हयातील सर्व मतदारांचा सहभाग वाढवुन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१९ मध्ये ७५ टक्के पेक्षा कमी मतदानाची टक्केवारी असलेल्या तालुकानिहाय मतदान केंद्रात विदयापिठाअंतर्गत अधिनस्त सर्व महाविदयालयात विदयार्थ्यांव्दारे मतदान जनजागृतीविषयावर रांगोळी स्पर्धा/चित्रकला/वादविवाद स्पर्धा, पथनाटय, कलापथक तसेच गावामध्ये मतदार जनजागृती रॅली आयोजित करणे, स्वीप कार्यक्रमाअंतर्गत मतदारांसाठी प्रतिज्ञा देणे, याप्रमाणे महाविदयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मतदार जनजागृती अभियान असे विविध उपक्रम राबविण्यात यावे.

आपले अधिनस्त असलेले जिल्हयातील सर्व महाविदयालयाचे प्राचार्य यांना सुचीत करण्यात यावे की, भारत निवडणुक आयोग निर्देशानुसार विशेष जनजागृती करुन जिल्हयातील महाविदयाल स्तरावर जास्तीत जास्त जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवून किमान ७५ टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी वाढ होण्यास आपण सहकार्य करावे.हि विनंती.

(डॉ. सचिन मडावी)
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा
जिल्हा नोडल अधिकारी (स्वीप),गडचिरोली

प्रतिलिपी :- माहितीस्तव सविनय सादर.
१.मा.जिल्हाधिकारी, तथा निवडणूक निर्णय अधिकारी,गडचिरोली.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा
जिल्हा नोडल अधिकारी (स्वीप),गडचिरोली

SVEEP

## जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली यांचे वतीने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 चे अनुषंगाने स्वीप कार्यक्रमाअंतर्गत मतदारांसाठी प्रतिज्ञा

" आम्ही भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु "

धन्यवाद!

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय**

**कॉम्प्लेक्स एरीया, चंद्रपूर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक - 442605**

दुरध्वनी क्र. 07132- 222011 Email – dydeogad@gmail.com

क्र.कार्या-10/अ.का.03-निवडणूक/कावि/40 /2024 दिनांक- 15 फेब्रुवारी.2024

**निवडणूक तात्काळ/अत्यंत महत्वाचे:-**

प्रति,

सहाय्यक जिल्हाधिकारी
तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,
067-आरमोरी / 068-गडचिरोली / 069-अहेरी

**विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2024**
SVEEP (स्वीप) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी 75% पेक्षा कमी मतदान टक्केवारी असलेल्या मतदान केंद्रांवर उपक्रम राबविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांकरिता 067-आरमोरी, 068-गडचिरोली, 069-अहेरी या तीन विधानसभा मतदार संघाअंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता विविध उपक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. आगामी निवडणूकीसाठी मा.निवडणूक आयोगाने 75% पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी अपेक्षिलेली आहे.

त्याकरिता, मतदान प्रक्रियेत सर्व मतदारांचा सहभाग वाढवून मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2019 मध्ये 75% पेक्षा कमी मतदानाची टक्केवारी असलेल्या मतदान केंद्रांवर जनजागृती करण्याचे हेतूने डॉ.सचिन मडावी, सहाय्यक आयुक्त, सामजकल्याण, गडचिरोली तथा जिल्हा नोडल अधिकारी (स्वीप) यांचे मार्गदर्शनाखाली SVEEP (स्वीप) अंतर्गत कलापथक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांद्वारे पथनाट्य असे विविध उपक्रम राबवून, मतदारांमध्ये मतदानाविषयी जास्तीत जास्त जनजागृती करुन तसा सहचित्रीत अनुपाल अहवाल वेळोवेळी या कार्यालयास तसेच जिल्हा नोडल अधिकारी (स्वीप) यांचेकडे सादर करण्यात यावा.

आपले सुलभ संदर्भाकरिता यासोबत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2019 अंतर्गत 75% पेक्षा कमी टक्केवारी असलेल्या सर्व मतदान केंद्रांची यादी विधानसभा मतदार संघानिहाय यासोबत संलग्न करण्यात येत आहे. Manual on SVEEP July 2023 मधील मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन मतदार जागृती अभियान प्रभावीपणे राबवून किमान 75% मतदानाची टक्केवारी आणण्यासाठी आपण आवश्यक प्रयत्न कराल ही अपेक्षा.

शुभेच्छासह...!

सहपत्र:-वरीलप्रमाणे

(संजय मीणा, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी
तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
12-गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघ

//2//

**प्रतिलिपी**:- डॉ.सचिन मडावी (मो.क्र.7720839155), सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली तथा जिल्हा नोडल अधिकारी (स्वीप), 012-गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघ यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपण तीनही सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समन्वयाने व मार्गदर्शनात SVEEP उपक्रम राबवावेत. प्रसंगी स्थानिक भाषेतील संदेश प्रभावीपणे वापरावेत.

**जिल्हाधिकारी**
**तथा निवडणूक निर्णय अधिकारी,**
**012-गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघ**